


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



कार्तिकी एकादशीनिमित्त विठोबा-रखुमाईची कृपा तुम्हा साऱ्यांवर कायम राहो..!

कार्तिकी एकादशीच्या

सर्व वारकरी बांधवांना आणि भाविकांना

हार्दिक शुभेच्छा!



www.surajyadigital.com | गुरुवार, दि.२३ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे ‣ अंक : ५४ वा ‣ किंमत : ५ रुपये ‣ पाने ८


# पंढरपूर नगरीत वैष्णवांची मांदियाळी

## कार्तिकी एकादशी : चार लाखांहून अधिक भाविक दाखल

सुराज्य/पंढरपूर

**विठुरायाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक पंढरीत दाखल झाले आहेत. कार्तिकी एकादशीचा सोहळा गुरूवार, दि. २३ रोजी असून, यासाठी पंढरपूरमध्ये दशमीपर्यंतच चार लाख भाविक दाखल झाले असावेत, असा अंदाज आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवारी सायंकाळीच येथे आले असून, ते सपत्नीक श्री विठ्ठल रखुमाईची पहाटे शासकीय महापूजा करणार आहेत. दरम्यान, यंदा विविध आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विश्रामगृह परिसरासह शहरात मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.**

आषाढी पाठोपाठ कार्तिकी यात्रेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. वारकरी संप्रदायाचा चार्तुमास या एकादशी नंतरच संपतो. यामुळे या उत्सवास मोठे धार्मिक महत्त्व आहे. हा सोहळा साजरा करण्यासाठी मुंबई, कोकण, कर्नाटकसह विविध भागातून जवळपास चार लाख भाविक पंढरपूर शहर व परिसरात दाखल झाले आहेत.

या भाविकांनी केलेल्या विठ्ठल नामाच्या जयघोषामुळे अवघी पंढरी दुमदुमून गेली आहे. सर्वत्र भगव्या पताका, गळ्यात टाळ, मुखात संताचे अभंग असा सर्वत्र उत्साह दिसत आहे. श्री विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शन रांगेत हजारो भाविक उभे असून, बुधवारी सायंकाळी गोपाळपूर रस्त्यावरील नऊ पत्राशेड भाविकांनी भरले होते. ही रांग आता वाढत जाईल. दरम्यान, ६५ एकरात एक लाखांहून अधिक भाविकांनी मुक्काम ठोकला आहे. शहरातील मठ, मंदिर परिसर, घरोघरी भाविक उतरल्याचे चित्र आहे. सायंकाळनंतर गर्दी वाढताना दिसत होती. बसस्थानक, रेल्वे स्टेशन गर्दीने हाऊसफुल्ल होती. गुरूवारी पहाटे शासकीय महापूजा होत असून, यानंतर पदस्पर्श दर्शन सुरू होणार आहे. यंदा मंदिर समिती व प्रशासनाने अनेक सोयी सुविधा भाविकांना दिल्या आहेत. मंदिर परिसर, पासष्ट एकर, चंद्रभागा वाळवंट, प्रदक्षिणा मार्गावर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून गर्दीवर लक्ष ठेवले जात आहे. मराठा आरक्षण, कोळी समाजाचे दाखले आदी प्रश्नावर विविध संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिल्यामुळे यंदा पोलिसांचा मोठा बंदोबस्त आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठी खबरदारी घेतली आहे. उजनी धरणातून कार्तिकीसाठी सोडलेले पाणी बुधवारी सायंकाळी पंढरपूरमध्ये दाखल झाले असून, हे अगदी दशमी दिवशी चंद्रभागेत आले आहे. चंद्रभागा नदीचे वाळवंट भाविकांच्या गर्दीने फुलले होते. शहरात भाविकांची गर्दी वाढली असून, श्री विठ्ठल मंदिराकडे येणारे रस्ते भाविकांनी फुलले आहेत.



पंढरपूर : पंढरपुरात उपमुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आरोग्य मंत्री तानाजी सावंत, प्रशांत परिचारक आदींनी वारकऱ्यांसोबत भजनाचा टाळ वाजवत ठेका धरला.





### दोन हजार सातशे बसेसचे नियोजन

एस.टी. महामंडळाच्यावतीने यंदा तब्बल दोन हजार ७०० यात्रा स्पेशल बस गाड्यांचे नियोजन केले आहे. यामाध्यमातून हजारो भाविक पंढरीत दाखल होऊ लागले आहेत. पंढरीतील भव्य अशा नवीन चंद्रभागा बस स्थानकातून या कालावधीमध्ये राज्यभरातून बस गाड्यांची वाहतूक होणार आहे. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाने केले आहे.

### पाच टन फुलांनी मंदिराची सजावट...

कार्तिकी एकादशीनिमित्ताने पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराला सजविण्यात आले आहे. विठ्ठल मंदिरात पुणे येथील भाविक राम जांभूळकर यांनी पाच टन फुलांच्या सहाय्याने सजावट केली आहे. या सजावटीसाठी २२ प्रकारच्या पाना-फुलांचा वापर केला असून, सुंदर आणि लक्ष वेधून घेतील अशा वेगवेगळ्या डिझायनच्या माळा तयार केल्या आहेत. उद्या गुरुवारी एकादशीला विठ्ठलासाठी कमळाचा हार बनविण्यात येणार आहे.

### तगडा पोलीस बंदोबस्त असणार

यात्रा निर्विघ्नपणे पार पडावी, कोणत्याही प्रकारच्या चोरीसारख्या घटना घडू नयेत, यासाठी साध्या वेशातील पोलीस गर्दीच्या ठिकाणी जागोजागी थांबून लक्ष ठेवणार आहेत. ११३ सहायक पोलीस निरीक्षक, तीन हजार पोलीस कर्मचारी, बाराशे होमगार्ड, बीडीडीएस पथक, एसआरपीएफ, वाहतूक पोलीस असा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

---

टाकळी सिकंदर ग्रामपंचायत

## आशाबाई चव्हाण यांचे ग्रामपंचायत सदस्यत्त्व रद्द

**सोलापूर** : मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील ग्रामपंचायत सदस्या आशाबाई अप्पासाहेब चव्हाण यांचे सदस्यत्त्व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी रद्द ठरविले आहे. तीन अपत्ये असल्याच्या कारणावरून हे सदस्यत्त्व रद्द करण्यात आले आहे.

**तीन अपत्याच्या कारणावरून जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला निर्णय**

सामाजिक कार्यकर्ते पंकज सौदागर चव्हाण यांनी चव्हाण यांच्याविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दिली होती. आशाबाई चव्हाण यांनी तीन अपत्ये असताना ते लपवून खोटी माहिती देत ग्रामपंचायतीची निवडणूक लढविली होती. यात त्या विजयी झाल्या होत्या. चव्हाण यांच्या तक्रारीनंतर सुनावणी घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी सदस्यत्व रद्द केला. यात तक्रारदार चव्हाण यांच्यातर्फे ॲड. लक्ष्मीकांत गवई, सदस्य चव्हाण यांच्यातर्फे ॲड. एन.के.शिंदे यांनी काम पाहिले. विहित मुदतीत निवडणूक खर्च सादर न करणे, तीन अपत्ये, अतिक्रमण आदी कारणावरून जिल्ह्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांवर आतापर्यंत अनेक ठिकाणी कारवाई करण्याचा बडगा जिल्हाधिकाऱ्यांनी उगारला आहे.

---

## घराला आग लागून सहा लाखांचे प्रापंचिक साहित्य जळून खाक

**नागणेवाडी परिसरातील घटना**

सुराज्य/सोलापूर



मंगळवेढा शहरालगत असलेल्या नागणेवाडी परिसरात एका घराला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत प्रापंचिक साहित्य जळून अंदाजे ५ ते ६ लाखाचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती रामचंद्र खांडेकर यांनी दिली.

रामचंद्र खांडेकर हे सेवानिवृत्त एसटी चालक असून, त्यांचे नागणेवाडीमध्ये दोन मजली घर आहे. दि.२१ नोव्हेंबर रोजी ते मिरजेला गेले होते. कुटुंबातील अन्य महिला सदस्य हे त्याच परिसरात असलेल्या हनुमान मंदिरात किर्तन चालू असल्याने ते तेथे गेले होते. सायंकाळी ४ वाजता इमारतीच्या वरच्या मजल्यावर आग लागल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, अग्निशामक दल, खाजगी टँकर व हनुमंत तरूण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे ही आग आटोक्यात आणण्यात मदत झाल्याने होणारी मोठी दुर्घटना टळली. या आगीत दोन मुलांच्या लग्नात आलेले प्रापंचिक साहित्य, फ्रीज, कुलर, न्याहरी सेट, टीव्ही, सायकल, कॉम्प्युटर, कपाटे, साड्या, बेड, रोख रक्कम असा एकूण अंदाजे ५ ते ६ लाखाचे प्रापंचिक साहित्य जळून खाक झाले. नागरिकांनी नगरपालिकेला कॉल करून अग्निशामक दलाची मागणी केली. मात्र, हे अग्निशामक दल कार्तिक वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे गेल्याने येण्यास मोठा विलंब झाला.


खाजगी पाण्याचे टँकर मागवून तरूण युवकांच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करीत असतानाच अग्निशामक दल हजर झाले. घटनास्थळापासून दूर उभे करून पाण्याचा मारा करण्यात आला.

या परिसरातील घरे एकमेकांना चिटकून असल्याने आगीच्या ज्वाला पाहून परिसरातील नागरिक व कुटुंबीय भयभीत झाले होते. आग आटोक्यात आल्यानंतर या परिसरातील नागरिकांचा जीव भांड्यात पडला.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सुट्ट्या संपल्या!

| कल्याण |
|---|
| 357-51-137 |

| मुंबई |
|---|
| ------------ |

---

## दोन लाखांची उचल घेतलेल्या कामगाराला घरातून उचलले

**कुर्डूवाडीतील वीटभट्टी चालकाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा**

सुराज्य/कुर्डूवाडी

दोन लाख रुपयांची उचल घेतलेल्या वीटभट्टी कामगाराला वीटभट्टी मालकाने कुर्डूवाडीतील राहत्या घरातून घेऊन गेल्याची घटना बालाजीनगर, कुर्डूवाडी येथे घडली.

वीटभट्टी कामगाराने पावणे दोन लाख रुपये वीटभट्टी मालकाकडून घेतले होते. दरम्यान, त्या कामगाराला कुर्डुवाडी येथील राहत्या घरातून पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास बोलेरो गाडीतून बळजबरीने नेले. याबाबत स्वाती अंकुश खंडागळे यांच्या फिर्यादीवरुन वीटभट्टी मालक परशुराम मारुती खाडे (भामट, करवे, कोल्हापूर) यांच्यावर कुर्डुवाडी पोलिसांत अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे.



फिर्यादी व तिचे पती अंकुश हे दोघे मागील दोन वर्षापूर्वी परशुराम मारुती खाडे यांच्या वीटभट्टीवर कामास होते. त्यावेळी वीटभट्टी मालकाचे थोडे थोडे करुन सुमारे पावणे दोन लाख रुपये फिर्यादी व तिच्या पतीकडे आहेत. पंधरा दिवसांपूर्वी वीटभट्टी मालक हे कुर्डुवाडी येथे येऊन माझे पैसे कधी देतो असे म्हणाले असता फिर्यादीने थोडे थोडे करुन देतो असे सांगितले.

त्यावर पैसे घेऊन मी काय करु. तुम्ही कामाला या. तुम्हाला यावेच लागेल नाही तर मी घेऊन जाईन, असे म्हणून निघून गेले. यानंतर फिर्यादी व त्यांचे कुटुंब झोपलेले असताना वीटभट्टी मालक खाडे हे फिर्यादीच्या घरी आले. फिर्यादीला लाथ मारून तिच्या पतीला बळजबरीने बोलेरो गाडीमध्ये बसवून घेऊन गेले.

---


सातवे पुण्यस्मरण

स्व. उमाकांत राठोड (साहेब)

(माजी सभापती - पंचायत समिती, दक्षिण सोलापूर)

मृत्यू दि. २३/११/२०१६





तुका म्हणे एका मरणेची सरे । उत्तमची उरे कीर्ती मागे ।।

आमच्या संस्थेचे संस्थापक

लोकनेते स्व. उमाकांत राठोड (साहेब)

यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन...!

सौजन्य

किसनराव मागास समाज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

- शक्ती प्राथमिक आश्रमशाळा
- चिंतामणी माध्यमिक आश्रमशाळा
- शक्ती कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय
- केसर प्रशाला

चिंतामणीनगर, मुळेगाव तांडा, ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

लोकनेते स्व. उमाकांत राठोड यांच्या सातवे पुण्यस्मरण दिनानिमित्त आज गुरुवार, दिनांक २३/११/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता त्यांच्या प्रतिमेस गुलाल व पुष्पवृष्टी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तरी स्व. उमाकांत राठोड (साहेब) प्रेमी कार्यकर्ते व हितचिंतक उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला

विजय उमाकांत राठोड

सरपंच, ग्रा.पं., मुळेगाव तांडा. । अध्यक्ष, किसनराव मागास समाज शिक्षण प्रसारक मंडळ

टिप : बागलकोट (कर्नाटक) येथे दुर्गा देवीची यात्रा होती. त्यामुळे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.